सायबर सुरक्षेसाठी जनजागृती अन् विद्यार्थ्यांना मार्गदर्शन !

शिक्षण विश्व : क्विक हील फाउंडेशन व एमआयटी एसीएससीच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। आळंदी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी क्विक हील फाउंडेशन आणि एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी (डी) यांच्या संयुक्त विद्यमाने एक विशेष सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. अर्न अँड लर्न योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम तनिष ऑर्किड सोसायटी, फेज १ आणि फेज २ येथे पार पडला.

या उपक्रमाचा प्रमुख उद्देश नागरिकांना सायबर गुन्ह्यांपासून सतर्क करणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. अमित ताले यांनी महाविद्यालयाची माहिती आणि उपक्रमामागील उद्दिष्ट स्पष्ट करून केली. त्यानंतर सायबर वॉरिअर क्लबच्या सदस्यांनी उपस्थित नागरिकांना सायबर सुरक्षेची शपथ दिली.

उपक्रमातील मुख्य आकर्षण नादब्रह्म सांस्कृतिक गटाने सादर केलेले प्रभावी पथनाट्य ठरले. "सायबर गुन्हे टाळा – प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय" हा संदेश केंद्रस्थानी ठेवून या नाट्यप्रयोगाद्वारे नागरिकांना संशयास्पद दुवे उघडू नयेत, अनोळखी व्यक्तींना ओटीपी किंवा बँक खात्याची माहिती देऊ नये, तसेच फिशिंग कॉल्स व मेसेजेसपासून सावध राहावे असे प्रभावी संदेश देण्यात आले.

सायबर गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सामान्य नागरिक सहज फसवले जात आहेत. अशावेळी सायबर सुरक्षेची माहिती असणे अत्यंत आवश्यक बनले आहे. याच पार्श्वभूमीवर या उपक्रमात नागरिकांना १९०३ या राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांकाची माहिती देण्यात आली आणि सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमामुळे सोसायटीतील नागरिकांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली असून, समाजात सायबर सुरक्षेच्या अनुषंगाने सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांची नियमित गरज असल्याचे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.